follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd No.७२१०५/९९ ✻ वर्ष २५ ✻ अंक ३०८ सातारा ✻ मंगळवार दि ६ ऑगस्ट २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

थोडक्यात

शेख हसीना भारताच्या आश्रयाला

आगरताळा : आरक्षण विरोधी आंदोलनामुळे आगडोंब उसळलेल्या बांगलादेशची सत्ता लष्कराने ताब्यात घेतली असून पंतप्रधान शेख हसीना देश सोडून भारताच्या आश्रयाला आल्या आहेलाख जणांचा संतप्त जमाव

काही आठवड्यापूर्वी बांगलादेशमध्ये आरक्षण विरोधी आंदोलनामुळे अराजक सदृश परिस्थिती निर्माण झाली. हिंसेचा आगडोब उसळला. शेख हसीना यांच्या नेतृत्वाखालील सरकारने सुरुवातीच्या काळात ठामपणे परिस्थिती हाताळली. मात्र ती आटोक्यात येत नसल्याने आंदोलकांच्या बहुसंख्या मागण्या मान्य झाल्या.

त्यानंतर काही काळ बांगलादेश मधील परिस्थिती निवळत आहे असे जाणवत असतानाच तीन दिवसापूर्वीपासून पुन्हा हिंसाचाराला सुरुवात झाली आहे. आज तब्बल वीस लाख जणांचा संतप्त जमाव पंतप्रधानांच्या निवासस्थानी चाल करून येत असताना लष्कर प्रमुखांच्या सल्ल्याप्रमाणे शेख हसीना यांनी पंतप्रधान पदाचा राजीनामा दिला आणि त्या भारताच्या आश्रयाला आल्या आहेत.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत राज्यात १०० मेगावॅटचा टप्पा पार

मुंबई : घराच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प बसवून मोफत वीज मिळविण्याच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत राज्यात २५,०८६ ग्राहकांनी १०१.१८ मेगावॅट क्षमतेची यंत्रणा बसविल्यामुळे राज्याने शंभर मेगावॅटचा टप्पा पार केला.

सर्वसामान्य वीज ग्राहकांसाठी अत्यंत उपयुक्त अशा या योजनेच्या अंमलबजावणीवर भर देण्याची सूचना मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणला केली आहे.

योजनेची अंमलबजावणी महावितरणच्या माध्यमातून होत असून शंभर मेगावॅटचा टप्पा ओलांडल्याबद्दल महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी वीज ग्राहकांचे अभिनंदन केले. ग्राहकांनी या योजनेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

राज्य सरकारला दिलासा

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजने' विरोधातील याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली

मुंबई : निवडणुकीच्या तोंडावर मतदारांना आकर्षित करण्यासाठी राज्य सरकारनं 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' आणि 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' आणली. करदात्यांच्या पैशावर राबवली जाणार असल्यानं ही योजना स्थगित करण्याची मागणी करणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. मात्र, आज मुंबई उच्च न्यायलयानं राज्य सरकारला दिलास देत याचिका फ ेटाळून लावली. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली.

न्यायालयानं काय म्हटलं : राज्य सरकारनं ही कल्याणकारी योजना आणली असून सरकारनं घेतलेला हा धोरणात्मक निर्णय आहे. त्यामध्ये हस्तक्षेप करण्यास उच्च न्यायालयानं नकार दिला आहे. यामुळं राज्य सरकारच्या या महत्वाकांक्षी योजनेसमोरील आव्हान दूर झालं. चार्टर्ड अकाउंटंट नावेद मुल्ला यांच्यातर्फे एडवोकेट पेचकर यांनी ही जनहितयाचिका दाखल केली होती. मात्र, सरकारच्या निर्णयात हस्तक्षेप करण्यास नकार देत उच्च न्यायालयानं जनहित याचिका फेटाळून लावली.

कल्याणकारी योजनांसाठी भरतो कर : आम्ही सरकारच्या कल्याणकारी योजनांसाठी कर भरतो , अशा प्रकारे उधळपट्टी करण्यासाठी कर भरत नाही, १४ ऑगस्ट पूर्वी या जनहित याचिकेवर निर्णय होऊन योजनेला स्थगिती मिळावी, अशी मागणी त्यांनी केली होती. मतदानाच्या वेळी मतदारांना पैसे वाटप करण्याचा प्रकार घडतो, त्या प्रकारे सरकारचा हा व्यापक प्रमाणात मतदारांना लाच देऊन मत मिळवण्याचा प्रकार असल्याची टीका याचिकेद्वारे करण्यात आली होती.

सरकार तर्फे एडवोकेट जनरल डॉक्टर बीरेंद्र सराफ यांनी बाजू मांडली. ही जनहित याचिका निराधार असून फेटाळून लावावी, अशी मागणी त्यांनी केली. पेचकर यांनी या योजनेत भेदभाव केला जात असून अडीच लाख रुपये पेक्षा जास्त उत्पन्न असलेल्यांना याचं लाभ मिळणार नाही, याकडं लक्ष वेधलं.

बांगलादेशात हिंसाचार भडकला

बांगलादेश : बांगलादेशमध्ये सरकारी नोकऱ्यांमधील कोटा पद्धतीविरोधात आंदोलन सुरु आहे. आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी बांगलादेशमध्ये पुन्हा एकदा हिंसाचार उफाळून आलाय. देशभरात प्रचंड हिंसाचार आणि जाळपोळ झाली. पंतप्रधान शेख हसीना यांच्या राजीनाम्याची मागणी करणारे आंदोलक आणि सत्ताधाऱ्यामध्ये जोरदार हाणामारी झाली. यात १४ पोलिसासह ९० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला असून शेकडो जण जखमी झाले आहेत.

आतापर्यंत ९१ जणांचा मृत्यू: स्थानिक मीडिया रिपोर्ट्सनुसार, देशभरात झालेल्या हिंसक संघर्षात आतापर्यंत ९१ जणांचा मृत्यू झाला आहे. पोलीस मुख्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, मृतांमध्ये १४ पोलिसांचा समावेश आहे. त्यापैकी १३ जणांचा सिराजगंजच्या इनायतपूर पोलीस ठाण्यात मृत्यू झाला. हिंसाचारावर नियंत्रण मिळवण्यासाठी गृह मंत्रालयानं रविवारी सायंकाळी ६ वाजता संचारबंदी लागू केली. तसंच इंटरनेट सेवेबरोबरच सरकारनं फ ेसबुक, मेसेंजर, व्हाट्सअप आणि इन्स्टाग्राम बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

विधानसभेसाठी मनसेकडून दोन उमेदवार जाहीर!

मुंबई : सध्या राज्यभरात आगामी विधानसभा निवडणुकांची धामधूम सुरु आहे. सर्वच पक्ष यासाठी कंबर कसून तयारीला लागले आहेत. लोकसभेत महायुतीला पाठिंबा देणाऱ्या मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीसाठी स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर ते आज सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. या दरम्यान, मनसेने विधानसभेसाठी दोन उमेदवारांची घोषणा केली आहे. शिवडी आणि पंढरपूरच्या जागेवर मनसेने आपले उमेदवार जाहीर केले आहेत.

मनसेने एक पत्रक प्रसिद्ध करत याबाबत माहिती दिली आहे. मनसेने दक्षिण मुंबईतील शिवडी विधानसभेसाठी पक्षाचा निष्ठावंत चेहरा बाळा नांदगावकर यांना मैदानात उतरवण्याचा निर्णय घेतला आहे. तर दुसरीकडे पंढरपूर विधानसभा मतदारसंघातून दिलीप धोत्रे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. सध्या शिवडी विधानसभेत ठाकरे गटाचे अजय चौधरी, तर पंढरपूर विधानसभा मतदारसंघात भाजपचे समाधान अवताडे विद्यमान आमदार आहेत.

शिवडी विधानसभा मतदारसंघ हा दक्षिण मुंबईतील महत्त्वाचा मतदारसंघ आहे. या मतदारसंघात सध्या ठाकरे गटाचे अजय चौधरी विद्यमान आमदार आहेत. अजय चौधरी हे २०१४ आणि २०१९ असे दोनवेळा निवडून आले आहेत.

शरद पवार कागलमध्ये डाव टाकण्याच्या तयारीत

कोल्हापूर : आगामी विधानसभा निवडणुकीत कागल विधानसभा मतदारसंघातून तुतारीच्या चिन्हावर समरजीत घाटगे यांना रिंगणात उतरवण्याची तयारी शरद पवार गटाने सुरु केल्याची माहिती समोर येत आहे. शरद पवार गटाकडून समरजीत घाटगे यांना तशी ऑफर देण्यात आली असून राष्ट्रवादी काँग्रेसम धील वरिष्ठ नेते त्यांच्या संपर्कात असल्याची माहिती आहे.

यामुळे कागल विधानसभेचे विद्यमान आमदार हसन मुश्रीफ यांची डोकेदुखी वाढू शकते. परंतु, मला विधानसभा निवडणुकीत कोण उभे राहील, याची चिंता नाही, असे हसन मुश्रीफ यांनी म्हटले आहे. ते सोमवारी कोल्हापूरमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

राज्यात पावसाचा जोर ओसरणार

मुंबई : राज्यात सध्या मान्सून सक्रीय झाला असून सध्या पावसाचा जोर चांगलाच वाढलाय. कोकण घाटमाथ्यावर जोरधारा सुरु असून मध्य म हाराष्ट्रात पावसाने कहर झाल्यांचं चित्र आहे. मध्य महाराष्ट्रातील अनेक मंदिरं गोदावरीपात्रात बुडाली असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. दरम्यान, पुढील चार ते पाच दिवस कोकण घाटमाथ्यासह मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पावसाचा जोर कमी होणार असल्याचा इशारा हवामान विभागानं दिलाय.

दक्षिण गुजरातपासून केरळ किनाऱ्याला समांतर कमी दाबाचा पट्टा सक्रीय असल्याने राज्यात पावसाचा जोर वाढला होता. सध्या मध्य प्रदेश, राजस्थानच्या लगत हा कमी दाबाचा पट्टा सरकल्याने येत्या काही दिवसात कोकण घाटमाथ्यासह मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पावसाचा जोर ओरण्याची चिन्हे आहेत.

भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या हवामान अंदाजानुसार पुढील ५ दिवस पावसाचा जोर कमी राहणार असला तरी पुणे, सातारा जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून विदर्भातील काही जिल्हे आणि कोकणात पावसाचा यलो अलर्ट देण्यात आलाय.

कोणत्या जिल्ह्यांना कोणता अलर्ट?

पुणे आणि सातारा जिल्ह्याला हवामान विभागाने पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला असून पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, कोल्हापूर जिल्ह्यांसह बुलडाणा, अकोला, अम रावती, वाशीम, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यांना तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा इशारा 'यलो अलर्ट' आहे. उर्वरित राज्यात हलक्या सरींचा अंदाज आहे.

मराठवाड्यात सोसाट्याचा वाऱ्यासह हलका पाऊस

प्रादेशिक हवामान केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, कोंकणातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये घाट भागातील तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा (३०-४० किमी प्रतितास वेग) आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

कमी दाबाचे क्षेत्र निवळणार

राज्यात कमी दाबाचे क्षेत्र मध्य प्रदेश, राजस्थानला जोडून असणाऱ्या परिसरांमध्ये सक्रीय आहे. त्यामुळे राज्यात राजस्थान आणि पाकिस्तान परिसरावर हवेचे कमी दाब क्षेत्र कायम असून, त्याला लागून ५.८ किलोमीटर उंचीवर चक्राकार वारे वाहत आहेत. त्यामुळे मान्सूनचा आस पुढे सरकल्याचे दिसून आले.

भंडारदरा निळवंडेतून विसर्ग सुरू

अहमदनगर : भंडारदरा पाणलोट क्षेत्रात पावसाचा हाहाकार. घाटघर, रतनवाडी, पांजरे येथे रेकॉर्ड ब्रेक पाऊस झाला आहे. भंडारदरा धरणातून २७ हजार तर निळवंडे धरणातून ७ हजार कयुसेक् ने विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

शनिवारी दिवस रात्र मुळा भंडारदरा धरणांच्या पाणलोट क्षेत्राला धुव्वाधार पावसाने झोडपून काढले. या चोवीस तासांत घाटघर येथे तब्बल १९ इंच म्हणजेच ४७५ मिमी पाऊस कोसळला तर रतनवाडी येथे ४४९ आणि पांजरे येथे ४४५ मिमी तर भंडारदरा येथे २४५ मिमी पाऊस पडला. या अती अती मुसळधार पावसाने जनजीवन ठप्प झाले आहे. जिकडे तिकडे पाणीच पाणी झाले असून शेती पाण्याखाली गेली आहे. शेत जमिनींचे बांध फुटले आहे.

या धुमाकूळ घातलेल्या पावसामुळे भंडारदरा धरणात २४ तासांत १ हजार २७३ दलघफू नवीन पाण्याची आवक झाली, यामुळे पाणी पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी धरणातून मोठ्या प्रमाणावर म्हणजेच २७ हजार ११४ क्युसेक ने पाणी सोडण्यात आले.

या पूर्वी १९ सप्टेंबर २००८ मध्ये धरणातून ३० हजार ९१८ कयुसेक् ने पाणी सोडण्यात आले होते. या नंतर प्रथमच धरणातून पाणी सोडण्यात आले.

वाकी येथील कृष्णावंती नदीवर बांधण्यात आलेल्या लघु पाटबंधारे तालावावरून ४ हजार ४७ कयुसेक् ने विसर्ग सुरू आहे.

या मोठ्या प्रमाणावरील पाण्यामुळे निळवंडे धरणातील पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली आणि या धरणातूनही या वर्षी प्रथमच ७ हजार ३२० कयुसेक् ने पाणी प्रवरा नदीच्या पात्रात सोडण्यास सुरूवात झाली. हरिश्चंद्रगडाच्या परिसरातही पावसाने कहर केला असल्यामुळे मुळा नदीलाही आता पूर आला आहे सकाळी सहा वाजता लईच जवळील मुळा नदीचा विसर्ग २३ हजार ७६५ क्युसेक् इतका होता.

कोयनेचे दरवाजे आठ फुटांवर ; कण्हेर, उरमोडीतून पाण्याचा विसर्ग बंद

सातारा : जिल्ह्याच्या पश्चिमेकडील घाटमाथ्यावरपाऊसकमी झाला आहे. यामुळे धरणात येणाऱ्या पाण्याच्या आवकवर परिणाम झाल्याने कण्हेर आणि उरमोडीच्या दरवाजातील विसर्ग पूर्ण बंद करण्यात आला आहे. तरकोयना धरणाच्यादरवाजातील विसर्ग ५० हजारांवरुन ४० हजारांपर्यंत कमी झाला असून दरवाजे आठ फुटांवर आहेत. यामुळे धरणातीलपाणीपातळीतवाढ होणार आहे. तर २४ तासांत महाबळेश्वरला सर्वाधिक १२० मिलिमीटर पाऊस झाला आहे.

जिल्ह्यात मागील तीन आठवड्यापासून दररोज पाऊस पडत आहे. पूर्व तसेच पश्चिम भागातही पावसाने दमदार हजेरी लावली. यामुळे पश्चिमेकडील कोयना, धोम, बलकवडी, कण्हेर, तारळी, उरमोडी या प्रमुख धरणांतीलपाणीसाठामोठ्या प्रमाणात वाढला. धरणे लवकरच ८० टक्क्यांवर गेली. त्यामुळे पाणीपातळी नियंत्रित करण्यासाठी सर्वच प्रमुख धरणांतून विसर्ग सुरू करण्यात आला. परिणामी नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली होती. पण, गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर कमी झाला. त्यातच रविवारपासून पश्चिमेकडील घाटमाथा परिसरात पावसाची उघडझाप सुरू झाली आहे. यामुळे धरणांतही पाण्याची आवक सावकाश आहे. यासाठी धरण व्यवस्थापनांनी धरणातील विसर्ग कमी करण्याचा निर्णय घेतला आहे.

सोमवारी सकाळपर्यंतच्या २४ तासांत कोयनानगर येथे ९३ तर नवजाला ७२ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. तर एक जूनपासून आतापर्यंत कोयनेला ४ हजार १२१, नवजा येथे ४ हजार ७७३ तर महाबळेश्वरमध्ये ४ हजार ५७१ मिलिमीटर पर्जन्यमानाची नोंद झालेली आहे. कोयना पाणलोट क्षेत्रात पाऊस सुरू असला तरी प्रमाण कमी आहे.

धरणात येणाऱ्या पाण्याची आवक कमी झाली आहे. सकाळच्या सुमारास ४५ हजार ६११ क्यूसेक वेगाने पाणी येत होते. यामुळे धरणातील विसर्ग कमी करण्यात आला. दुपारी बाराच्या सुमारास सहा दरावाजातून ४० हजार क्यूसेकने पाणी सोडण्यात आले. तसेच पायथा वीजगृहाची दोन्ही युनीट सुरू असून त्यातून २ हजार १०० क्यूसेक वेगाने पाणी सुरूच आहे. त्यामुळे धरणातून ऐकूण ४२ हजार १०० क्यूसेक विसर्ग कोयना नदीपात्रात सोडला जात आहे.

वाई तालुक्यात धोम धरण आहे. धरण पाणलोट क्षेत्रात पाऊस कमी झाला असल्याने आवकवर परिणाम झाला आहे. त्यामुळे सोमवारी सकाळच्या सुमारास दरवाजा आणि विद्युतगहातून होणारा विसर्ग ६ हजारवरुन एक हजार ६० क्यूसेक करण्यात आलेला आहे. तरीही पावसाचे प्रमाण पाहून आवक कमी किंवा अधिक करण्यात येणार आहे, असे स्पष्ट करण्यात आलेले आहे. कण्हेरमधून ३८० क्यूसेक..

सातारा तालुक्यातील कण्हेर धरणात मोठ्या प्रमाणात पाणीसाठा झाला आहे. त्यामुळे धरणातून विसर्ग करण्यात येत होता. पण, सध्या पाऊस कमी झाल्याने सांडव्यातून विसर्ग बंद करण्यात आला आहे. सकाळच्या सुमारस विद्युतगृहातूनच ३८० क्यूसेक वेगाने पाणी सोडले जात होते.

उरमोडीतून ४५० क्यूसेक विसर्ग

उरमोडी धरणाच्या सांडव्यातीलही विसर्ग बंद करण्यात आला आहे. सध्या विद्युतगृहातून ४५० क्यूसेक पाणी सोडले जात आहे. पाण्याची आवक पाहून विसर्गाबाबत निर्णय घेतला जाईल, असे धरण व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले.

गिरणा नदीत अडकलेल्या १२ जणांची हेलिकॉप्टरने सुखरुप सुटका!

नाशिक : मुंबईत पाऊस काही काळाने विश्रांती घेत असला तरी राज्यभरात पावसाचे थैमान सुरुच आहे. नाशिक जिल्ह्यातही गेल्या तीन दिवसांपासून मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. धरणांच्या पाण्याची पातळी देखील वाढली आहे. त्यातच मालेगाव येथील गिरणा नदीला देखील पूर आला आहे. या नदीवर काल मासेमारी करण्यासाठी गेलेले १२ मासेमार काल पुराच्या पाण्यात अडकले. या सर्वजणांनी उंच खडकाचा आधार घेतल्यामुळे ते सुखरुप राहिले. एक रात्र त्यांनी या खडकावरच काढली. ते अडकून तब्बल १५ तासांहून अधिक काळ लोटल्यानंतर अखेर आता

त्यांना हेलिकॉप्टरद्वारे पुराच्या पाण्यातून बाहेर काढण्यात यश आले आहे.

नाशिकच्या सात धरणांमधून सध्या विसर्ग सुरु असल्याने नद्यांना पूर आल्याचे चित्र आहे. त्यातच काल गिरणा नदीच्या पाण्यात मासे पकडायला गेलेले १२ जण अडकल्याची घटना घडली. नदीच्या पाणी पातळीत वाढ होत असल्याने या १२ जणांना तब्बल १५ तासांहून अधिक कालावधी उलटूनही नदीपात्रातून बाहेर काढण्यात अनेक अडचणी येत होत्या. अखेर त्यांची लष्कराच्या हेलिकॉप्टरद्वारे सुखरुप सुटका करण्यात आली. मनपा प्रशासन, अग्निशमन दल, एसडीआरएफ जवान, तसेच स्थानिक नागरिक या सर्वांनीच या बचावकार्यात शर्थीचे प्रयत्न केले.

दरम्यान, या तरुणांना वाचविण्यासाठी धुळे येथून एसडीआरएफची टीम रात्री घटनास्थळी दाखल झाली. मात्र रात्री अंधारामुळे बचावकार्य थांबविण्यात आले होते. सकाळी अग्निशमन दल आणि नागरिकांच्या मदतीने रेस्क्यू ऑपरेशन राबविण्यास सुरुवात करण्यात आली. पुराच्या पाण्यात वाढ झाली असल्याने बचावकार्यात अडचणी येत होत्या.

मात्र, पाण्यात अडकलेले सर्वजण एका उंच खडकावर बसून राहिल्यामुळे सुखरूप होते.

नाशिकच्या जिल्ह्याचे पालकमंत्री दादा भुसे, आमदार मौलाना मुफ्ती मोहम्मद हे परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. अडकलेल्या तरुणांना जेवण देखील पोहचवण्यात आले होते. दरम्यान, अशा आपत्कालीन परिस्थितीत आता हेलिकॉप्टरची मदत घेवून २१ जणांना बाहेर काढण्यात येणार असल्याची माहिती मालेगाव महापालिकेचे आयुक्त रवींद्र जाधव यांनी दिली होती. अखेर आता त्यांची सुटका झाली आहे.

शिखर शिंगणापूर तीर्थक्षेत्र विकासासाठी कटीबद्द : आ. जयकुमार गोरे

शिखर शिंगणापूरमध्ये कोट्यावधिंच्या विकासकामांचे भूमिपूजन संपन्न

शिंगणापूर येथील विविध विकास कामाचे उद्घाटन करताना आमदार जयकुमार गोरे,सोनिया गोरे,सरपंच सारिका शेंडे व इतर मान्यवर

दहिवडी : संपूर्ण महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या तीर्थक्षेत्र शिखर शिंगणापूरला येणाऱ्या भाविकांना मूलभूत सुविधा मिळणे गरजेचे आहे आत्तापर्यंत शिंगणापूर मध्ये कोट्यावधी रुपयांची विकास कामे झाली असून यापुढेही शिखर शिंगणापूर तीर्थक्षेत्र विकास कामासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन आमदार जयकुमार गोरे यांनी केले.

शिखर शिंगणापूर ग्रामपंचायतीच्या वतीने आयोजित विविध विकास कामांचे उद्घाटन भूमिपूजन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते यावेळी सौ .सोनिया गोरे,माजी जिल्हा परिषद सदस्य अरुण गोरे, माजी सरपंच राजाराम बोरावके,सरपंच सारिका शेंडे उपसरपंच राजेंद्र पिसे उपस्थित होते.

आ. गोरे म्हणाले शिखर शिंगणापूर हे अखिल महाराष्ट्राचे कुलदैवत असून या ठिकाणी येणाऱ्या भाविकांना मूलभूत सोयी सुविधा मिळणे आवश्यक आहे माझ्या आमदारकीच्या कालावधीत गेल्या पंधरा वर्षात शिंगणापूर मध्ये मोठ्या प्रमाणावर विकास कामे झाले असून यापुढेही आपण शिंगणापूर विकासासाठी कटिबद्ध आहे. जिहे कटापूर योजनेतील उर्वरित १६ गावांना पाणी देण्यासाठी सर्वेक्षण करण्यात आले असून यामध्ये शिंगणापूरचा समावेश आहे लवकरच शिंगणापूर परिसरातील नागरिकांना जे काठापुर योजनेचे पाणी मिळणार असल्याची माहिती आमदार जयकुमार गोरे यांनी दिली.

प्रास्ताविक माजी सरपंच राजाराम बोराटे यांनी केले यावेळी सर्व ग्रामपंचायत सदस्य व कार्यकर्ते उपस्थित होते.

आ. जयकुमार गोरे यांच्या माध्यमातून चार वर्षात सुमारे सोळा कोटींची विकासकामे झाली आहेत. येथे येणाऱ्या लाखो भाविकांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यापुढेही मूलभूत सोयीसुविधा पुरवण्यामध्ये ग्रामपंचायत प्रशासन प्रयत्नशील आहे अशी ग्वाही सरपंच सारिका शेंडे यांनी दिली.

फलटण विधानसभा बहुजन मुक्ती पार्टी ताकदीने लढवणार : तुषार मोतलिंग

भ्रष्टाचाराविरोधात दि. १६ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषदेत बेमुदत ठिय्या आंदोलनाचा दिला इशारा

सातारा : समाजामध्ये होणार्या अन्यायाविरोधात नेहमीच एल्गार पुकारणारी बहुजन मुक्ती पार्टी आगामी काळात फलटण विधानसभा ताकदीने लढवणार असल्याचे प्रतिपादन बहुजन मुक्ती पार्टीच्या पश्चिम महाराष्ट्राचे प्रभारी तुषार मोतलिंग यांनी केले आहे. याचबरोबर जिल्हा परिषदेत बोकाळलेल्या भ्रष्टाचाराविरोधात दि. १६ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषदेत बेमुदत ठिय्या आंदोलन करणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

सातारा शासकीय विश्रामगृहात झालेल्या बैठकीत त्यांनी वरील प्रतिपादन केले. या बैठकीवेळी बहुजन मुक्ती पार्टी मध्ये ज्योस्त्ना सरतापे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह प्रवेश केला. त्याबद्दल त्यांची महिला सातारा जिल्हाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. याचवेळी वाई मधील संदीप कांबळे यांची युवा आघाडी जिल्हा कार्याध्यक्ष पदी निवड झाली तसेच कैलास पवार यांची सातारा जिल्हा उपाध्यक्ष व सुनील कांबळे यांची महाबळेश्वर तालुका अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे.

या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना तुषार मोतलिंग यांनी सांगितले की, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत जी भरती केली होती, त्यामध्ये ओबीसी, एससी, एसटी चा कोटा बिंदू नामावली प्रमाणे न भरता पैसे घेऊन मनमानी पद्धतीने भरती केलेली आहे. हराळे चौकशी समिती समोर डॉ. महेश खलिपे यांनी योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता केली नाही. त्यामुळे येत्या दहा दिवसांत डॉ. अनिरुद्ध आठल्ये, डॉ. राधाकिशन पवार, डॉ. महेश खलिपे, अनामिका घाडगे यांच्यावर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी फौजदारी गुन्हे दाखल करावेत. तसेच सचिन कांबळे (स्टेनो) मागासवर्गीय असल्याने त्यांना डावलून जितेंद्र देसाई गेली १३ वर्षे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे बेकायदेशीरित्या स्वीय सहायक (शिपाई मधून पदोन्नती) म्हणून काम करत असल्याने मागासवर्गीयांवर अन्याय होत आहे तसेच भ्रष्टाचारही वाढला आहे त्याची हकालपट्टी करावी. अन्यथा १६ ऑगस्ट रोजी अनिश्चित काळासाठी जिल्हा परिषदेत ठिय्या आंदोलन करणार आहोत, असा इशाराही मोतलिंग यांनी दिला आहे.

या पत्रकार परिषदेला संबोधित करताना प्रदेश प्रभारी प्रताप पाटील, प्रदेशाध्यक्ष श्रीकांत ओव्हाळ, सचिन बनसोडे, सुनील जाधव, तुषार मोतलिंग, अजित नलावडे, ज्योस्त्ना सरतापे, शिवराज झेंडे, भुषण गायकवाड, संदीप आवडे, संजय रुद्राक्ष, अमित कांबळे, हेमंत ठोंबरे, प्रमोद काळे, सुनील कांबळे, भरत ठोंबरे, सतेश गायकवाड, पोपट माने व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

मायणी मेडिकल कॉलेजच्या घोटाळ्याशी माझा संबंध नाही : आ.जयकुमार गोरे

जातिवंत असाल तर मैदानात या रामराजे यांना खुले आव्हान

सातारा : मायणी मेडिकल कॉलेजच्या घोटाळ्याशी माझा काहीही संबंध नाही .विरोधकांच्या माध्यमातून या गोष्टीचे उगाच भांडवल केले जात आहे मायनी मेडिकल कॉलेजच्या आर्थिक व्यवहाराचा लॉगिन आयडी संदीप देशमुख यांचा आहे त्या आर्थिक व्यवहारात संदर्भात त्यांची प्रवर्तन संचालनालयाने चौकशी केली त्यामध्ये माझा काय संबंध ? असा सवाल माणचे आमदार जयकुमार गोरे यांनी पत्रकार परिषदेत केला.

यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम ,भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष चिन्मय कुलकर्णी, निलेश नलावडे, जिल्हा परिषद कृषी सभापती शिवाजी शिंदे, इत्यादी उपस्थित होते .गोरे यांनी यावेळी अनेक कागदोपत्री पुरावे पत्रकारांच्या समोर सादर केले

गोरे पुढे म्हणाले एखाद्या आर्थिक गैरवहारात ईडीने संदीप देशमुख यांची चौकशी केली असेल त्यामध्ये विनाकारण माझे नाव गोले जात आहे. त्या प्रकरणाशी माझा कोणताही संबंध नाही मायणी मेडिकल कॉलेज हे देशमुख यांचे नाही तर कॉलेज ट्रस्टचे आहे हे सर्व प्रसार माध्यमांनी एकदा लख्खपणे लक्षात ठेवावे आर्थिक व्यवहाराच्या संदर्भात जो आरोप होत आहे त्याचा थेट संबंध संदीप देशमुख यांच्याशी आहे त्यासंदर्भात जर त्यांची आर्थिक निकषावर चौकशी केली असेल तर यामध्ये माझा कोणताही हात नाही आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधक उगाच या प्रकरणाचे भांडवल करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

या प्रकरणाचे बोलवते धनी कोण आहेत हे सर्वांना ठाऊक आहे या प्रकरणात कोर्ट जो आदेश करेल तो मान्य आहे आमदार गोरे यांना सुद्धा याच पद्धतीने पाच वर्षांपूर्वी अडचणीत आणण्याचा प्रयत्न झाला होता.

रामराजे तुम्ही जातीवंत म्हणत असाल तर समोरासमोर या मैदानात लढा दुसऱ्याच्या खांद्यावर बंदूक ठेवून फैरी झाडू नका .तुम्ही माढ्यात काय झाले म्हणून बोलता तुमच्या फलटण तालुक्यात काय घडत आहे ते बघा मतांची टक्केवारी घसरली आहे.

तुमच्यात हिम्मत असेल तर माणमधून लढा . महायुतीत आहात म्हणता आणि विरोधात काम करता अजित दादांकडे जाता आणि शरद पवारांच्या चमच्याने पाणी पिता अशा शेलक्या शब्दात गोरे यांनी विधान परिषदेचे सभापती रामराजे यांच्यावर जोरदार टीका केली.

राष्ट्रवादी अध्यक्ष शरद पवार यांच्यापुढे कधीही झुकणार नाही आता थेट इशारा देत जयकुमार गोरे म्हणाले पवारांच्या पुढे सगळे राजकारणी झुकत असतील मी झुकणार नाही मागे सुद्धा शरद पवानी माझ्यावर गुन्हे दाखल व्हावेत म्हणून प्रयत्न केले .मी स्वाभिमानी आहे जनतेची कामे करतो माझी समाजाची नाळ आहे मराठा समाज आरक्षणाचा मुद्दा विधानसभेत मांडला होता खटाव आणि माण तालुक्यातला मराठा व ओबीसी समाज माझ्यासमोर आहे कोणी किती चाली खेळल्या तरी शरद पवारांच्या पुढे मी झुकणार नाही असे त्यांनी सांगितले.

शिवसेना उबाठा गटाचे बोगदा परिसरामध्ये रास्ता रोको आंदोलन

सातारा : शाहू चौक ते बोगदा ते सज्जनगड या दरम्यानचा सातारा शहराच्या हद्दीतील आणि हद्दीबाहेरील मुख्य रस्ता प्रचंड खड्ड्यांमुळे सध्या चर्चेमध्ये आहे .निकृष्ट दर्जाचे रस्ते दुरुस्ती करणाऱ्या ठेकेदारांच्या निषेधार्थ शिवसेना उबाठा गटाच्या वतीने बोगदा परिसरामध्ये दुपारी बारा वाजता रस्ता रोको आंदोलन करण्यात आले .या आंदोलनामुळे सातारा ते परळी यादरम्यानचे वाहतूक सुमारे अर्धा ते पाऊण तास ठप्प झाली होती संबंधित ठेकेदारांवर तातडीने कारवाई करण्यात यावी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचे रस्त्याची तातडीने दुरुस्त व्हावी अशी मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन मोहिते यांनी केली आहे शाहूपुरी पोलिसांनी या आंदोलनात हस्तक्षेप करून आंदोलकांना ताब्यात घेतले

सातारा शहरातून परळीला जोडणारा सातारा सज्जनगड रस्ता पूर्णपणे खड्ड्यात गेला आहे दोन महिन्यापूर्वीच कोट्यवधी रुपयाचा निधी खर्च करून या रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली होती .मात्र समर्थ मंदिर चौक ते बोगदा या दरम्यानच्या रस्त्याच गेल्या आठ दिवसांमध्ये डांबर उखडून खडी रस्त्यावर आली आहे तसेच धस कॉलनी मध्ये सुद्धा हाच प्रकार झाला असून वाहन चालकांचे अपघात झाले आहेत . या संदर्भात जिल्हा प्रशासनाला शिवसेनेच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले होते मात्र याची दखल घेण्यात न आल्याने उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सचिन मोहिते यांनी बोगदा परिसरामध्ये चक्क खुर्च्या टाकून रस्त्यात रास्ता रोको केला

या आंदोलनामध्ये सातारा तालुकाप्रमुख सागर रायते सुनंदा महामुलकर ,सुनील पवार ,सादिक शेख ,रुपेश वंजारी ,प्रशांत शेळके, शहर संघटक प्रणव सावंत, सचिन जगताप, रवी चिकणे, रवी भंगे, शिवराज टोणपे, सागर धोत्रे, इमरान बागवान ,अनिल गुजर, हरी पवार, अमोल गोसावी, अरिफ शेख, सनी बसवंत ,राम साळुंखे, आनंद देशमुख, सुनील मोहिते, अजय सावंत, संदीप मोहिते, परवेज शेख, आकाश पवार, इत्यादी उपस्थित होते.

कागलमधून तुतारी हाती घेत हसन मुश्रीफांना आव्हान देणार?

समरजीतसिंह घाटगेंचं मोजक्या शब्दांत थेट उत्तर

विधानसभा निवडणूक जाहीर होण्याआधीच सर्व राजकीय पक्षांकडून मतदारसंघांमध्ये मोर्चेबांधणी सुरू आहे. पक्षफुटीनंतर साथ सोडलेल्या आमदारांना आव्हान देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्षशरद पवारहे नव्या चेहऱ्यांच्या शोधात आहेत. कागलविधानसभा मतदारसंघातून विद्यमान आमदार आणि मंत्रीहसन मुश्रीफयांच्याविरोधातशरद पवारांकडूनभाजप नेते समरजीतसिंह घाटगे यांना उमेदवारी देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे. याबाबत आता घाटगे यांनीही आपली प्रतिक्रिया दिली आहे.

माझ्या उमेदवारीबाबत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षातच चर्चा सुरू आहे. परंतु याबाबतच्या ऑफरला मी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. माझ्या उमेदवारीच्या सर्व चर्चाही मी माध्यमांवरच बघत आहे, असा खुलासा समरजीतसिंह घाटगे यांनी केला आहे.दरम्यान, सध्या समरजीतसिंह घाटगे यांनी आपले पत्ते ओपन करण्यास नकार दिला असला तरी आगामी काळातकागलच्याराजकारणात नक्की काय घडामोडी घडतात, हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.हसन मुश्रीफांनीकाय म्हटलं आहे?

समरजीतसिंह घाटगे यांच्या उमेदवारीची चर्चा सुरू झाल्यानंतर यावर हसन मुश्रीफ यांनी प्रतिक्रिया दिली आहे. माझ्या विरोधात कोण उमेदवार असेल याची मी चिंता करत नाही. मी अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून घड्याळ या चिन्हावर माझा प्रचार सुरू केला आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत मी आमदार होणार मंत्रिमंडळातही सहभागी होणार, असा विश्वास मुश्रीफ यांनी व्यक्त केला आहे.

कृष्णा नदीतील महिलेचा मृतदेह आठव्या दिवशी सापडला

सातारा : राऊतवाडी ता. सातारा येथील कृष्णा नदीपात्रात उडी घेतलेल्या संचिता अक्षय साळुंखे यांचा मृतदेह शनिवारी तब्बल आठ दिवसांनंतर तासगाव गोजेगाव हद्दीतील कृष्णा नदीत सापडला.

संचिता साळुंखे या बेपत्ता असल्याची तक्रार सातारा तालुका पोलिस ठाण्यात दि. २७ रोजी करण्यात आली होती. त्यादिवशी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दि. २७ रोजी दुपारी साडेपाच ते सव्वा सहा वाजण्याच्या दरम्यान वडूथ ता. सातारा येथून संचिता अक्षय साळुंखे रा. राऊतवाडी ता. सातारा ही विवाहिता अक्षता अक्षय साळुंखे यांच्यासह कुठेतरी निघून गेल्याचे सांगण्यात आले. मात्र, त्या दिवसापासून त्या बेपत्ताच होत्या.

राऊतवाडी ता. सातारा येथील संचिता साळुंखे या विवाहितेने दोन वर्षाच्या अक्षितासह शनिवार, दि. २७ जुलै रोजी वडूथ येथील कृष्णा नदीच्या पुलावरुन उडी घेतली होती. त्याच दिवशी चिमुकल्या अक्षिताचा मृतदेह नदीपात्रात सापडला होता. पुरामुळे संचिताचा शोध घेण्यात अडथळा येत होता. शनिवारी गोजेगाव तासगाव हद्दीत कृष्णा नदीच्या पात्रात संचिताचा मृतदेह सापडला.

काम नाही झाले तरी चालेल, वजाबाकी करण्याच्या भानगडीत पडू नका; अजित पवारांच्या कानपिचक्या

बारामती : बारामती येथे आयोजित पवार यांनी काही पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांना सज्जड इशारा दिला. चुकीच्या प्रकारामुळे मला ट्रोल करण्यात आले,राज्यात माझी बदनामी झाल्याचे पवार म्हणाले. कार्यकर्ते पदाधिकारी यांनी आपापली जबाबदारी पार पाडावी. गटातटाचे राजकारण करु नये. एकमेकांबाबत हलक्या कानाचे राहु नका. समोरच्या लोकांनी वेगळ्या पध्दतीने शब्द वापरल्यास मनाला लावून घेवू नका. बोलण्याने कोणाला भोक पडत नाहीत. अरे ला कारे म्हणू नका, ९ तारखेपासून आपण राज्याच्या दौऱ्यावर जाणार आहोत. त्यामूळे कार्यकर्ते पदाधिकारी यांनी आपली जबाबदारी घरचे काम समजून कर्तव्याच्या भावनेतून करा, देखील सुचना पवार यांनी केल्या.

राज्यातील माता भगिनींच्या सबलीकरणासाठी विविध योजना सरकारने आणल्या आहेत. त्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहचविवण्याचे काम पदाधिकार्यांनी करावे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी पैसे घेतात. गैरप्रकार करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. राज्यातील माता भगिनींच्या सबलीकरणासाठी विविध योजना सरकारने आणल्या आहेत. त्या पुर्ण करण्याची राज्य सरकारमध्ये धमक आहे. त्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहचविवण्याचे काम पदाधिकाऱ्यांनी करावे, अशा सुचना पवार यांनी केल्या.

पवार म्हणाले,विधानसभा अस्तित्वात आल्यापासून राज्यात कोणत्याही आमदाराने आपल्याएवढी विकासकामे केली आहेत.माझा दावा आहे,त्यासाठी म्हणाल ती पैज लावु,काही हजार कोटी बारामतीत आणले.या गोष्टी झाकुन राहत नाहित.रस्ते चकाचक झाले,रेल्वेप्रकल्प मार्गी लागला.शहरातील महत्वाची कामे मार्गी लावली.त्यानंतर शहराचा पुर्ण कायापालट झाला.माता भगिनींनी आपण निवडुन दिलेल्या लोकप्रतिनिधीने काय काम केले ते वेळ काढुन अवश्य पहावे.मात्र, तुमचे काम न बोलता होत असल्याने त्याची किंमतच राहिली नसल्याची खंत पवार यांनी व्यक्त केली.याबाबत माहिती देणारी पुस्तक लवकरच प्रसिध्द करणार असल्याचे पवार म्हणाले.

लोकसभेच्या वेळी काहीजण 'लोकसभेला ताई आणि विधानसभेला दादा' असं म्हणाले होते. पण कोणता दादा,असा प्रतिप्रश्न करीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मिश्कील टोला लगावला. पवार म्हणाले, कोणता दादा हे ठरविण्याचा अधिकार त्यांचा आहे. आपण त्यासाठी बळजबरी करु शकत नाही. त्यांचे केवळ मतपरीवर्तन करु शकतो, असे पवार म्हणाले. मागे मी धरणाचे बोललो. त्यानंतर आत्मक्लेष देखील केले. पण त्यानंतर काही अपशब्द वापरले नसल्याचे पवार यांनी नमूद केले.

मध्यंतरी काहीजणांनी काहींनी मला बहुरुपी केले. वेगळेच

मतदान वगळण्याबाबत नागरिकांचा गैरसमज, अफवावर विश्वास ठेवू नये आवाहन : अभिजीत नाईक

कोरेगांव ; भारत निवडणूक आयोगाच्या सूचना दि. २०.०६.२०२४ व २४.०७.२०२४ तसेच ०१.०८.२०२४ नुसार २५७ कोरेगाव विधानसभा मतदारसंघामध्ये मतदार याद्यांचा संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम २०२४ चा दुसरा टप्पा सुरू झाला आहे. त्याअंतर्गत सुमारे ८००० फॉर्म सात भरून मतदारांच्या नोंदीविरुद्ध हरकती घेण्यात आल्या आहे. ह्या हरकती भारत निवडणूक आयोगाने उपलब्ध करून दिलेल्या ऑनलाईन पोर्टल तथा अधिकृत वेबसाईटद्वारे घेण्यात आल्या असल्याची माहिती प्रांताधिकारी अभिजीत नाईक यांनी दिली.

प्रांत अभिजीत नाईक म्हणाले की, माझ्या निदर्शनास आले आहे की, ह्या हरकती म्हणजे 'आपली नावे वगळण्यात आली आहे' असा नागरिकांचा गैरसमज झाला आहे. समाज माध्यमांमध्ये याबाबत गैरसमज पसरविले जात आहे. याबाबत मी अभिजीत नाईक, उपविभागीय अधिकारी कोरेगाव तथा मतदार नोंदणी अधिकारी २५७ कोरेगाव विधानसभा मतदारसंघ या प्रेस नोटद्वारे स्पष्ट करू इच्छितो की, ह्या हरकतींच्या आधारे अद्याप कुणाचेही नाव वगळण्यात आलेले नाही. प्राप्त हरकतींबाबत भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांप्रमाणे हरकत घेणार व आक्षेपित मतदार (ज्याच्या नोंदीवर हरकत घेतली आहे तो मतदार) यांना सुनावणीची नोटीस बजावून आपले म्हणणे व पुरावे दाखल करण्याची संधी देण्यात येईल.

त्यानंतर भारत निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार निर्णय घेण्यात येईल.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, साताराासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, साताराासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

अजित पवार गटाने परस्पर बदललं लाडकी बहीण योजने'चं नाव; नव्या वादाला फुटणार तोंड?

मुंबई : महाराष्ट्रामध्ये सध्या सर्वाधिक चर्चेत असलेल्या गोष्टीमध्ये राज्यात सत्तेत असलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखालील सरकारने सुरु केलेल्या 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजने'चा समावेश होतो. अगदी अर्ज करण्यापासून ते या योजनेसाठी देण्यात येणाऱ्या निधीवरुन सत्ताधारी आणि विरोधीपक्षांमध्ये आरोप प्रत्यारोप झाले. असं असतानाच आता या योजनेच्या नावावरुन अजित पवार आणि सत्तेत असलेल्या शिंदे गटाच्या शिवसेनेमध्ये वाद होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यामागील कारण आहे अजित पवार गटाने आपल्या जनसन्मान यात्रेआधी परस्पर या योजनेच्या नावामध्ये बदल केला आहे.

लाडकी बहीण योजनेची चर्चा

राज्य शासनाने लोकसभा निवडणुकीनंतर मध्य प्रदेशम धील मुख्यमंत्री मेरी लाडली बहिणा योजनेप्रमाणे महाराष्ट्रात मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजना सुरु केली. या योजनेअंतर्गत राज्यातील महिलांना दर महिन्याला दीड हजार रुपये दिले जातील असं जाहीर करण्यात आलं. अंतरिम बजेटमध्ये अर्थमंत्री अजित पवार यांनी या योजनेसाठी चालू आर्थिक वर्षात ३५ हजार कोटी रुपयांची तरतूद केल्याचं जाहीर केलं. यावरुन बराच वाद झाला. हा पैसा नेमका उभा कठून आणि कसा करणार याबद्दल विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. मात्र यावर सरकारकडून सविस्तर स्पष्टीकरण स्वत: अजित पवारांनी दिलं. या योजनेवरुन होणाऱ्या टीकेच्या पार्श्वभूमीवर सर्व सत्ताधारी पक्ष एकत्र आल्याचं दिसून आलं असलं तरी आता याच योजनेच्या नावावरुन सत्तेत असलेल्या अजित पवार गटाने वेगळी भूमिका घेतल्याचं दिसत आहे.

अजित पवारांची जनसन्मान यात्रा ८ ऑगस्टपासून सुरु होत आहे. या यात्रेच्या जाहिरातीचे पोस्टर्स नुकतेच समोर आले आहेत. या पोस्टरमध्ये अजित पवार मोठ्या आकाराचा नमस्कार करताना फोटो दिसत असून त्या खाली प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि छगन भुजबळ आधी ज्येष्ठ नेत्यांचे फोटो दिसत आहेत. त्या खालोखाल या यात्रेच्या पोस्टवर 'लाडकी बहीण योजने'ची जाहीरात करण्यात आली असून दर महिन्याला प्रत्येक महिलेला १५०० रुपये दिले जातील असं बसवर लिहिलेलं नमूद करण्यात आलं आहे.

मात्र अजित पवार गटाच्या या योजनेच्या नावातून अजित पवार गटाने 'मुख्यमंत्री' शब्द वगळण्यात आला असून 'माझी लाडकी बहिण योजना' एवढाच उल्लेख पोस्टवर आहे. त्यामुळे आता या योजनेच्या नावावर श्रेयवादाची लढाई सुरु आहे की काय अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे.

तसेच मुख्यमंत्री हा उल्लेख अजित पवार गटाकून मुद्दाम वगळण्यात आला आहे की इतर काही कारण यामागे आहे अशी चर्चाही सुरु आहे.

धारावी पुनर्विकासाच्या समर्थनार्थ स्थानिकांचे आंदोलन, शासकीय सर्वेक्षणाला दिला पाठिंबा

मुंबई : धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या समर्थनार्थ काही स्थानिक नागरिक उभे राहू लागले आहेत. धारावी पुनर्विकास मार्गी लागावा, यासाठी जन आंदोलन करण्याचा निर्णय स्थानिकांनी घेतलाय. तसंच, शासकीय सर्वे क्षणालादेखील वाढता पाठिंबा मिळू लागलाय. याबाबत नुकतीच 'धारावी बनाव आंदोलन समिती'ने धारावी रिडेव्हलपमेंट प्रोजेक्ट (डीआरपी)चे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. व्ही. आर श्रीनिवास यांची भेट घेतली. तसंच स्थानिकांचा या प्रकल्पाला पाठिंबा असल्याची माहिती यावेळी त्यांना देण्यात आली.

काही जणांकडून या प्रकल्पाला विरोध करण्याची भूमिका घेतली जात आहे. मात्र, शासकीय सर्वे क्षण तातडीने पूर्ण करावं जेणेकरुन या प्रकल्पाला गती मिळेल, अशी भूमिका 'धारावी बनाव आंदोलन समिती'ने घेतली आहे. सर्व्हेक्षणात अडथळा आणणारे लोक कायद्याचे उल्लंघन करत असल्याने त्यांच्याविरोधात कारवाई करण्याची मागणीदेखील यावेळी करण्यात आली.

धारावी बनाव आंदोलनच्या शिष्टमंडळासोबत आपली चर्चा झाली. त्यांनी दिलेले निवेदन स्वीकारले आहे. याबाबत लवकरच सकारात्मक निर्णय होईल. धारावी पुनर्विकास प्रकल्पात पात्र आणि अपात्र दोन्ही रहिवाशांना घर दिले जाईल. पात्र रहिवाशांना धारावीतच ३५० चौरस फुटाचे तर अपात्र रहिवाशांना मुंबईत ३०० चौरस फुटाचे घर दिले जाणार आहे. या प्रकल्पातील की टू की वचनामुळे बहुतांश रहिवाशांना संक्रमण शिबिरात पाठवले जाणार नाही. त्याऐवजी त्यांना थेट नव्या घराची चावी देण्यात येईल. प्रदूषण विरहित कायदेशीर उद्योगांना आणि व्यवसायांना धारावीतच जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

शासकीय सर्व्हेक्षणात अडथळा आणणाऱ्यांविरोधात कारवाई करा-धारावी बनाव आंदोलन समितीच्या शिष्टमंडळानं श्रीनिवासन यांची भेट घेतली. या शिष्टमंडळात दीपक कैतके, दीपक पवार, शैलेंद्र कांबळे, राजा अदाटे, श्रीकुमार जयस्वाल यांचा समावेश होता. ''धारावीत वास्तव्य नसलेले काहीजण या प्रकल्पाच्या शासकीय सर्व्हेक्षणात अडथळा आणत आहेत. यामाध्यमातून स्वत:चा राजकीय आणि आर्थिक लाभ करुन घेण्याचा त्यांचा डाव आहे. त्यामुळं त्यांच्याविरोधात कारवाई करावी,'' अशी मागणी दीपक कैतके यांनी केली. तर धारावीत वास्तव्यास असणाऱ्या खऱ्या धारावीकरांची भूमिका जाणून घेण्यासाठी धारावी बनाव आंदोलन समितीसोबत सरकारने संवाद साधण्याची गरज आहे, असेही ते म्हणाले.

नागरिकांचे प्रश्न तातडीने सोडवा : हसन मुश्रीफ

कोल्हापूर : सर्वात जास्त तक्रारी अर्ज महसूल, पोलिस आणि महानगरपालिका या विभागांच्या असतात. तक्रारदारला अर्ज निकाली निघणार असेल तर तातडीने मदत करा, अन्यथा रितसर लेखी देऊन नियम नमूद करून काम होणार नसल्याचे कळवा. वारंवार त्यांना अर्ज घेवून येण्याची वेळ येवू देवू नका, असे निर्देश पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी प्रशासनाला दिले. महिन्याच्या पहिल्या सोमवारी होणारा लोकशाही दिन व जनता दरबार जिल्हाधिकारी कार्यालयातील ताराराणी सभागृहात पालकमंत्री श्री. मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली व सर्व वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडला.

यावेळी पालकमंत्री श्री. मुश्रीफ यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना लोकशाही दिन व जनता दरबारात आलेल्या नागरिकांचे प्रश्न प्राधान्याने सोडवण्याचे निर्देश दिले. यावेळी सिद्धगिरी गुरुकुल फाउंडेशन आणि सिद्धगिरी मठ कणेरी यांच्यावतीने यशोवर्धन बारामतीकर यांनी पर्यावरपूरक गणेश मूर्ती पालकमंत्री व मान्यवरांना भेट दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे, पोलिस अधीक्षक महेंद्र पंडित, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., इचलकरंजी महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे, अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे, उप वनसंरक्षक गुरुप्रसाद, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सत्यवान मोरे, निवासी उपजिल्हाधिकारी संजय तेली, अति.आयुक्त कोल्हापूर महानगरपालिका राहूल रोकडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अरूण जाधव यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, अर्जदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही जलाशयांतील एकूण पाणीसाठा ९० टक्क्यांवर!

मुंबई : मुंबईत गेले काही दिवस सातत्याने पावसाच्या धारा सुरु आहेत. त्यामुळे मुंबईकरांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राला पाणीपुरवठा करणाऱ्या सात जलाशयांमधील एकूण पाणीसाठा ९० टक्क्यांवर पोहोचला आहे. अशाच पद्धतीने पाऊस बरसत राहिला तर हा पाणीसाठा लवकरच १०० टक्के होईल. आनंदाची बातमी म्हणजे ७ जलाशयांपैकी ४ जलाशये ओव्हर फ्लो झाली आहेत. त्यामुळे मुंबईकरांचा पाणीप्रश्न मिटला आहे.

मुंबई महानगरपालिकेने आज दिलेल्या माहितीनुसार, मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही जलाशयांमधील पाणीसाठा ९० टक्के इतका झाला आहे. आज सकाळी ६ वाजता मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही जलाशयांमधील पाणीसाठा १३,०२,६१९ दशलक्ष लीटर इतका झाला. म्हणजेच या धरणांमध्ये एकूण ९० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. मागच्या वर्षी याच दिवशी या धरणांमध्ये ११,५७,९१९ दशलक्ष लिटर म्हणजेच ८० टक्के पाणीसाठा होता. तुलनेने यावर्षी तो १० टक्क्यांनी वाढला आहे.

मुंबई शहर आणि उपनगराला अप्पर वैतरणा, मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार आणि तुळशी या ७ जलाशयांमधून पाणी पुरवठा केला जातो. यामध्ये ५ धरणं आणि २ तलाव आहेत. या सातही धरण आणि तलाव क्षेत्रात गेल्या काही दिवसांपासून चांगला पाऊस पडत आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठ्यात सातत्याने वाढ होताना दिसत आहे. यामधील तुलसी, विहार, मोडक सागर आणि तानसा ही जलाशये ओव्हर फ्लो झाली आहेत. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या या सातही धरणांमध्ये १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लिटर पाणी साठवण्याची क्षमता आहे. या धरणांमधून मुंबईला दिवसाला ३ हजार दशलक्ष लिटर पाणीपुरववठा केला जातो.

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही धरणातील पाणीसाठा –

अप्पर वैतरणा – ७५.७६ टक्के पाणीसाठा

मोडक सागर – १०० टक्के पाणीसाठा.

तानसा – ९९.३० टक्के पाणीसाठा.

मध्य वैतरणा – ९५.४१ टक्के पाणीसाठा.

भातसा – ८८.८७ टक्के पाणीसाठा.

विहार – १०० टक्के पाणीसाठा.

तुलसी – १०० टक्के पाणीसाठा.

दुधात भेसळ करणाऱ्यांवर मोक्का लावणार, अजित पवारांची भर सभेत तंबी

सांगवी : दुध भेसळ करणार आहे, हे सिद्ध झालं. त्याने भेसळ केलेली असेल तर त्याला फाशीची शिक्षा द्यावी, इथपर्यंतचा आम्ही कायदा करणार होतो. आता भेसळीसंदर्भातील कायदा त्याठिकाणी कडक करणार आहोत. आम्ही अध्यादेश काढतोय. दुधात भेसळ करणारी व्यक्त सापडली तर आम्ही त्याला मोक्का लावणार आहोत'', अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दुधात भेसळ करणाऱ्या लोकांना तंबी दिली आहे. ते सांगवी येथे बोलत होते.

अजित पवार म्हणाले, पाऊस पडतो आहे. मी अधिकाऱ्यांच्या संपर्कात आहे. उजनी धरण ९० टक्के भरले आहे. नदी काठी आम्ही लक्ष देऊन आहोत. लोकांचे कसे नुकसान होणार नाही याची खबरदारी घेतो. डॉक्टर आणि कर्मचारी यांचे हे निवासस्थान इथे होणार आहे. खूप मोठा निधी केंद्र आणि राज्य सरकार कडून आणतो आहे. लाडकी बहिण योजना सगळ्या महिलांसाठी आहे. फक्त त्यांचे उतपन्न अडीच लाखांच्या आत पाहिजे. शेतकऱ्यांचे वीज बिल माफ केलं. एका वर्षानंतर शेतकऱ्यांना दिवसा लाईट देण्याचा आमचा प्रयत्न आहे. काही जण आमच्यावर टीका करतात हा चुनावी जुम्ला आहे, पण हे खोटं आहे, असंही अजित पवार यांनी स्पष्ट केलं.

दुधाला ५ रूपये अनुदान द्यायचा निर्णय घेतला

पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, इथे पाण्याचा प्रश्न आहे. दोन जिल्ह्याचे खराब पाणी येतं. त्यासाठी आपण खराब पाणी रोखण्यासाठी प्रयत्न करतो आहे. मोठा निर्णय घ्यायचा म्हटलं तर कारखाने बंद करावे लागतील, परत तुम्ही माझ्यावर याल. सरकारमध्ये नसतो तर वीज माफ करता आली नसते. अनेक घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न आम्ही करतोय. दुधाला ५ रूपये अनुदान द्यायचा निर्णय घेतला आहे. आम्ही विद्यार्थी आणि विद्यार्थ्यना आधार लिंक केलं तर ५ लाख विद्यार्थी बोगस होते. दुधात भेसळ केली जाते.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून येरळामाईचे पाणीपूजन

पाणीपूजन करून निसर्गाच्या ऋणातून उतराई होण्याचा स्वाभिमानीच्या रणरागिणीचा प्रयत्न

वडूज : खटाव तालुक्यासाठी वरदायिनी ठरलेल्या येरळवाडी धरणाची कुस निसर्गाच्या कृपेने भरली आहे. येरळवाडी धरण तुडुंब भरले असून पाण्याचा विसर्ग सांडव्यावरून सुरू आहे. यामुळे धरण क्षेत्रातील बळीराजा सुखावला आहे. निसर्गाच्या कृपेने येरळा धरण तुडुंब भरल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या रणरागिनीनी खणा नारळाने ओटी भरून निसर्गाच्या कृपेतून उतराई होण्याचा प्रयत्न केला आहे.

गेल्या वर्षी खटाव तालुक्यातील बहुतांशी भागात पुरेसा पाऊस झाला नाही. जमिनीतील पाण्याची पातळी खोलवर गेली आहे शेती पाण्याची आणि पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली होती. तर जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला होता. येरळामाई नदी अक्षरशः कोरडी पडली आहे.

त्यामुळे दुष्काळी खटाव तालुक्याची वरदायिनी असलेल्या येरळवाडी धरणाने तळ गाठला होता त्यामुळे धरण अक्षरशः भेगाळलेल्या स्थितीमध्ये होते.

त्यामुळे जनसामान्यांना आणि शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने खटाव तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये पिण्याच्या आणि शेतीपाण्यासाठी संघर्ष उभा केला होता. येरळवाडी मध्ये जिहे कटापूर तसेच उरमोडीचे पाणी सोडून तालुक्याचे मुख्यालय असलेल्या वडूज शहरवासीयांना चांगले शुद्ध पाणीपुरवठा करा आणि शेती पाण्याचा आणि चाऱ्याचा प्रश्नही सोडवा ही मागणी सुद्धा स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि खटाव तालुका पाणी संघर्ष समितीच्या केंद्रस्थानी आणली होती. मात्र कागदी घोडे नाचवणारे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी खटाव तालुका वासीयांच्या मागणीकडे साफ दुर्लक्ष केलं. त्यामुळे तहसीलदार कचेरीसमोर स्वाभिमानी शेतकरी संघटनेसह विविध पक्षांचा समावेश असलेल्या खटाव तालुका पाणी संघर्ष समितीने मोठे जन आंदोलन उभे केले होते. मात्र तरीही खटाव तालुका दुष्काळात पिण्याच्या पाण्याच्या आणि चाऱ्याच्या प्रश्नामुळे उपेक्षितच राहिला.

जनसामान्यांच्या भावना तीव्र असल्यामुळे जनसामान्यांच्या भावना तीव्र असल्यामुळे मोठे जन आंदोलन उभे राहिल्यामुळे उरमोडीचे पाणी कॅनॉलला चालू राहिले, त्यामुळे तात्पुरता दिलासा मिळाला असला तरी येरळा माई मात्र भेगाळलेल्या अवस्थेमध्ये पोहोचली होती.

मात्र आता चांगल्या पावसामुळे ही परिस्थिती बदलली असल्याचं संघटनेचे राज्य प्रवक्ते अनिल पवार यांनी सांगितलं. तर लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला दुष्काळामध्ये येरळवाडीमध्ये पाणी सोडून सामान्य माणसांच्या हालअपेष्ट सोडवता आल्या नसल्या तर निसर्गाने मात्र आमच्यावर कृपा केली आहे. गेली अनेक वर्ष खटाव तालुक्यात हुलकावणी देणारा वळवाचा पाऊस पाच ते सहा वर्ष पडलाच नव्हता. मात्र यंदा मुसळधार बरसल्यामुळे खटाव तालुक्यामध्ये ओढे नाले तुडुंब भरलेले आहेत. येरळा धरणाच्या कुशीमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये पाण्याची आवक झाली आहे.धरण १००% भरले असून सांडव्यावरून पाण्याचा विसर्ग सुरू आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरले असल्यामुळे शहरासह आठ गावातील पाणी योजनांना नवसंजीवनी मिळाले आहे तर शेती पाण्याचे प्रश्न मोठ्या प्रमाणात निकाली निघाला आहे.निसर्ग मायबाप हाच आमचा खरा वाली अशी भावना महिला शेतकऱ्यांची असल्याचं स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या महिला संघटक माधुरी शिंदे यावेळी म्हणाल्या.

निसर्गाची कृपा झाल्यामुळे धरण तुडुंब भरलेले आहे. त्यामुळे निदान दोन वर्ष पाण्यासाठी आंदोलन करावे लागणार नाही. वडूज शहराला सुद्धा चांगला पाणीपुरवठा होईल. प्रशासनाकडे आम्ही वारंवार विनंती केली. लोकप्रतिनिधीकडे वारंवार विनंती केल्या मात्र कुणालाही आमचे दया आली नाही. आमची याचना निसर्गाने मान्य केली म्हणूनच आम्ही येरळामाईतील पाण्याचे पूजन करून निसर्गाला धन्यवाद देतो.

'निसर्गाची किमया न्यारी जलनायका तुझ्यापेक्षा भारी' अशी भावना या वेळेला उपस्थित लोकांमधे होती. यावेळी सौ माधुरी शिंदे, विद्या पवार, सारिका खाडे, वैशाली शिंदे, मंगल फडतरे, लक्ष्मी देवकर, सूर्यभान जाधव, तालुकाध्यक्ष दत्तू काका घार्गे, शरद खाडे संतोष तुपे, रामदास शिंदे, स्वाभिमानी पक्षाचे अध्यक्ष वैभव पाटील, संतोष बागल, सत्यवान मोहिते, अजय पाटील, विजय देवकर यांच्यासह परिसरातील शेतकरी आणि महिला भगिनी उपस्थित होत्या.

कोकणासाठी आणखी २० गणपती स्पेशल; मध्य रेल्वेकडून उद्यापासून आरक्षण सुरू

मुंबई : गणपतीसाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांची गर्दी लक्षात घेऊन मध्यरेल्वेने२०२ फेऱ्यांव्यतिरिक्त आणखी २० अतिरिक्त फेऱ्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. यारेल्वेगाड्यांचे आरक्षण ७ ऑगस्टपासून सुरू होणार आहे

या अतिरिक्त फेऱ्यांमध्ये लोकमान्य टिळक टर्मिनस - रत्नागिरी द्वि-साप्ताहिक विशेषच्या ८ फेऱ्यांचा समावेश आहे. ही ०१०३१ विशेष गाडी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून ६, ७, १३, १४ सप्टेंबर या दिवशी ८ वाजता सुटेल आणि रत्नागिरी येथे दुसऱ्या दिवशी ४:५० वाजता पोहोचेल. त्याचप्रमाणे ०१०३२ विशेष गाडी रत्नागिरी येथून ७, ८, १४, १५ सप्टेंबर या दिवशी सकाळी ८:४० वाजता सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस येथे त्याच दिवशी ५:१५ वाजता पोहोचेल. ही गाडी ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, करंजाडी, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड आणि संगमेश्वर रोड येथे थांबेल. त्याचप्रमाणे पनवेल - रत्नागिरी साप्ताहिक विशेषच्या ४ फेऱ्या चालवण्यात येणार आहेत. ही ०१४४३ विशेष गाडी पनवेल येथून ८ आणि १५ सप्टेंबर रोजी ४:४० वाजता सुटेल आणि रत्नागिरी येथे त्याच दिवशी ११.५० वाजता पोहोचेल. तसेच ०१४४४ विशेष गाडी रत्नागिरी येथून ७ आणि १४ सप्टेंबर रोजी ५:५० वाजता सुटून आणि पनवेल येथे दुसऱ्या दिवशी १:३० वाजता पोहोचेल. या गाडीला पेण, रोहा, माणगाव, वीर, करंजाडी, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड आणि संगमेश्वर रोड येथे थांबा देण्यात आला आहे.पुणे - रत्नागिरी साप्ताहिक विशेषच्या ४ फेऱ्या चालवण्यात येणार आहेत. यामध्ये ०१४४७ विशेष गाडी पुणे येथून ७ आणि १४ सप्टेंबरला ००.२५ वाजता सुटून रत्नागिरीला सकाळी ११.५० वाजता पोहोचेल. तसेच ०१४४८ विशेष गाडी रत्नागिरी येथून ८ आणि १५ सप्टेंबर रोजी ५:५० वाजता सुटून पुणे येथे दुसऱ्या दिवशी ५:०० वाजता पोहोचेल. ही ट्रेन चिंचवड, तळेगाव, लोणावळा, कल्याण, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, करंजाडी, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड आणि संगमेश्वर रोड येथे थांबेल.यामध्ये पनवेल - रत्नागिरी साप्ताहिक विशेषच्या २ फेऱ्यांचा समावेश आहे.

उजनी धरण भरले हो, ४० हजार क्युसेकचा विसर्ग; पंढरपूरसह काही गावांना पुराचा धोका, ५०० जणांना हलवले

सोलापूर : गेल्या वर्षीच्या तीव्र दुष्काळाच्या झळा सोसल्यानंतर यंदा उजनी धरण भरणार का याची काळजी सर्वांनाच लागली होती, आता उजनी तुडुंब भरू लागले असून येणाऱ्या पाण्याची अवाक १ लाख क्युसेक पर्यंत जाऊ लागल्याने आज सायंकाळी धरणातून तब्बल २० हजार क्युसेक विसर्ग सोडण्यात आला. भीमा नदीत हा विसर्ग सोडण्यात येत असल्याने परिसरातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून व्यास नारायण वसाहतीमधील ५०० जणांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आलं आहे. आज सकाळी उजनी धरणाने ९० टक्क्यांची पातळी गाठली असताना वरुन धरणाकडे येणाऱ्या पाण्याची अवाक १ लाख क्युसेक पर्यंत पोहोचल्याने धरण प्रशासनाने धरणातून सुरुवातीला २० हजार क्युसेक विसर्गाने पाणी सोडण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, पाण्याची पातळी वाढल्याने आता ४० हजार क्यूसेक गतीने पाणी नदी पात्रत सोडले जाणार आहे.

एका बाजूला उजनी धारण ओव्हरफ्लो होत असताना सातारा जिल्ह्यातील वीर धरणातूनही नीरा नदीत ४२ हजार क्युसेक विसर्गाने पाणी सोडण्यास सुरुवात झाली आहे. सोलापूर जिल्ह्याच्या सीमेवर असणाऱ्या नीरा नरसिहपूर येथे भीमा आणि नीरा नदीचा संगम होऊन हे सर्व पाणी पंढरपूरकडे येत असते. सध्या याच वीर धरणातून सोडलेल्या पाण्याने भीमा दुथडी भरून वाहत असताना आता यात उजनी धरणाचे पाणी येण्यास सुरुवात झाल्यास पंढरपूरचा पुराचा धोका वाढणार आहे. पुणे आणि सातारा जिल्ह्यात असाच

पाऊस सुरू राहिल्यास पुढच्या दोन दिवसात पंढरपूर शहर व नदीकाठच्या गावांना पुराचा तडाखा बसणार आहे. त्या पार्श्वभूमीवर प्रशासनाही अलर्ट मोडवर आहे.

सोलापूर जिल्ह्यासाठी वरदायिनी ठरलेले उजनी धरण १०० टक्के भरल्याने आता सोलापूर जिल्ह्यासह , नगर , उस्मानाबाद आणि पुणे जिल्ह्यातील अनेक भागाचा पिण्याच्या शेतीच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे . उजनी धरणाची एकूण क्षमता ११७.२३ ऊश्ण असून यात जिवंत साठ्यात ५३.५७ ऊश्ण तर मृत साठ्यात ६३.६६ ऊश्ण पाणी साठवता येते. यावर्षी धरणाने नीचांकी पातळी गटात वजा ६० टक्के एवढी पातळी गाठली होती. मात्र, जून महिन्यापासूनच पुणे जिल्ह्यात सुरु झालेल्या पावसाने आज ४ ऑगस्ट रोजी धरणातून पाणी सोडण्याची वेळ आली आहे. अजूनही उजनी पाणलोट क्षेत्रात २ महिने पावसाचा कालावधी असताना ऑगस्टमध्येच पूरस्थितीला सामोरे जाण्याची वेळ येणार असल्याचे दिसून येते. उजनी धरणात पूर नियंत्रणासाठी ११० टक्के पाणी साठविण्याची व्यवस्था करण्यात आली असल्याने १२३ ऊश्ण पर्यंत पाणी धरणात साठवता येवू शकते. मात्र, सध्या ज्या प्रमाणात उजनी धरणात पाणी येऊ लागले आहे हे पाहता प्रशासनाने आजपासून पाणी सोडण्याचा निर्णय घेतला आहे . दरम्यान, मागच्या वर्षी उजनी आजच्या तारखेला ५ टक्के भरले होते, आज ८९ टक्के भरले आहे.

५०० लोकांना सुरक्षितस्थळी हलवले

वीर आणि उजनी धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यास सुरुवात केल्याने पंढरपूर शहरातील व्यास नारायण वसाहतीतील ५०० लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्यास प्रशासनाने केली सुरुवात आहे. आज रात्रीपासून पुन्हा चंद्रभागेच्या पाणी पातळीत मोठी वाढ होणार असल्याने व्यास नारायण भागातील घरात पाणी शिरणार असल्याने येथील कुटुंबीयांना प्रशासनाने स्थलांतरित करण्यात येत आहे.

उजनी धरण ९१ टक्के भरले

उजनी धरणाचे १६ दरवाजे ४० सेंटीमीटरने उघडले असून उजनी धरणातून भीमा पात्रात २१ हजार क्युसेकने विसर्ग करण्यात आला. मात्र, रात्री ८ नंतर ४० हजार क्युसेकने हा विसर्ग करण्यात येत आहे. उजनी धरण ८९ टक्क्यापेक्षा अधिक भरलं असून भीमा काठाच्या लोकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. उजनी धरण सध्या ९१ टक्के इतकं भरलं असल्याने उजनी धरणातून भीमा नदीपात्रामध्ये सायंकाळी ५ पाच वाजल्यापासून २१ हजार ६०० क्युसेक इतका विसर्ग सुरु करण्यात आला होता. दौंड बंधाऱ्यातून उजनी धरणाच्या भीमा नदी पात्रात ९५ हजार २०० क्युसेक इतका विसर्ग येत असल्याने उजनी धरण व्यवस्थापनाने हा निर्णय घेतलाय. उजनी धरणाचे १६ दरवाजे हे ४० सेंटिमीटरने उघडण्यात आले आहेत. उजनी धरण हे एकूण ११७ टीएमसी क्षमतेचा असून सध्या उजनी धरणात १११ पूर्णांक ७७ टीम्स इतका पाणीसाठा झाला आहे.

सज्जनगड मॅरेथॉनची सर्वांना उत्सुकता

सातारा : सातारा शहर व परिसर डोंगरमाथ्याने वेढला आहे. येथील नागरिकांसह खेळाडू किल्ले अजिंक्यतारा, चारभिंती परिसर, पेढ्याचा भैरोबा, जानाई-मळाई डोंगर, वा) सज्जनगड आदी ठिकाणी नियमित अथवा आठवड्यातून दोनदा तरी व्यायामासाठी जरूर जातात. विशेषतः यामध्ये विविध खेळातील राज्य, राष्ट्रीय खेळाडूंसह मॅरेथॉनपटूंचा अधिक भर असल्याचे दिसून येते. या खेळाडूंसाठी आणि साताऱ्यातील नागरिकांसाठी न सज्जनगड येथील श्री समर्थ सेवा मंडळ -आणि शाहूपुरीतील दिवेकर हॉस्पिटल र यांच्या संयुक्त विद्यमाने ११ ऑगस्टलासज्जनगड रन २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे.

या मॅरेथॉनचे उद्घाटन समर्थ सेवा मंडळाचे कार्यवाह समर्थ भक्त मारुती बुवा रामदासी तसेच गजाननराव बोबडे परळी आणि सज्जनगड येथील समर्थ सेवेकरी रामदास यांच्या हस्ते होणार आहे या उद्घाटन सोहळ्यात तसेच मॅरेथॉन मधील स्पर्धकांना शुभेच्छा देण्यासाठी सर्व खेळाडूंनी तसेच जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांना शुभेच्छा द्याव्या असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे

या रनबद्दल माहिती देताना समर्थभक्त डॉ. अच्युत गोडबोले म्हणाले, श्री समर्थ रामदास स्वामींच्या साहित्याचा प्रचार आणि प्रसार करण्याबरोबरच नागरिकांना आरोग्याचा मंत्र द्यावा, यासाठी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. गजवडी (ता. सातारा) अभयसिंहराजे हायस्कूलपासून सुरू होणाऱ्या स्पर्धेचा समारोप सज्जनगड येथे श्री समर्थ सेवा मंडळाच्या कार्यालयानजीक होईल. १८ वर्षांवरील पुरूष व महिलांसाठी असलेल्या या पाच किलोमीटर अंतराच्या स्पर्धे तसंपूर्ण धावणमार्ग हा चढाचा असल्याने धावपटूंचा निश्चित कस लागेल; परंतु गडावरील पायऱ्या चढताना निसर्गरम्य परिसरामुळे धावपटूंना आनंद तरमिळेलच; पण त्यांच्यातील ऊर्जा

समर्थ रामदासस्वामींनी महत्त्व पटवून देण्यासाठी साताऱ्यास राज्यात मारुती मंदिरांची स्थापना केली. सज्जनगड रन २०२४ च्या आयोजनाचा हेतू देखील नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहावे हाच आहे-समाजाला बलोपासनेचे यशाच्या टप्प्यापर्यंत नेईल,असेही सांगितले.

या स्पर्धेसाठी नाव नोंदणी करणाऱ्यांना स्पर्धेपूर्वी टी शर्ट, टी बॅच तसेच स्पर्धा पूर्ण झाल्यावर पट ऑनलाइन सर्टिफिकेट, रामवस्त्र, (अल्पोपाहार) दिला जाणार आहे, माहिती प्रवीण कुलकर्णी यांनी दिली.

कागलच्या विकासाच्या राजकारणाला पाठिंबा : संजय मंडलिक

दाळतिट्टा : महायुतीचा उमेदवार म्हणून मी लोकसभेची निवडणूक लढलो, माझा पराभव झाला. पण पुढील काळात सुद्धा मी महायुतीचेच काम करणार आहे. सध्या माझ्यावर कोल्हापूर व उत्तर मतदार संघाची जबाबदारी दिली आहे. कागलची जबाबदारी माझ्याकडे नाही. ज्यावेळी महायुतीचे नेते माझ्यावर कागलची जबाबदारी देतील, त्यावेळी निश्चितपणे आम्ही आमची भूमिका वरिष्ठांचे मार्गदर्शन घेऊन स्पष्ट करणार आहोत. कागलच्या विकासाच्या राजकारणाला आमचा नेहमीच पाठिंबा आहे, असे प्रतिपादन माजी खासदार संजय मंडलिक यांनी केले.

स्व. विक्रमसिंह घाटगे यांच्या ७६ व्या जयंतीनिमित्त सानिका स्पोर्ट्स फाउंडेशन मुरगुड यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या शालेय शैक्षणिक साहित्य वाटप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोकुळ चे माजी अध्यक्ष रणजिसिंह पाटील होते. यावेळी शाहू ग्रुपचे अध्यक्ष समरजीत घाटगे प्रमुख उपस्थित होते.

पुढे बोलताना मंडलिक म्हणाले, सर्व समाजाला बरोबर घेऊन जायची शिकवण छत्रपती शाहू महाराजांनी दिली. तिच शिकवण पुढे घेऊन जाण्याचे काम स्व. विक्रमसिंह घाटगे व स्व. सदाशिवराव मंडलिक यांनी केले. कोल्हापूर मधील मंडळींना वाटते मुस्लिम व दलित समाजाची मते घेतली म्हणजे आम्ही पुरोगामी विचाराचे झालो, अशा मंडळींना मला आवाहन करायचे आहे की, त्यांनी दलित समाजाचा उमेदवार निवडणुकीसाठी उभा करावा व निवडून दाखवावा, असेही मंडलिक म्हणाले.

कागलच्या विकासासाठी निवडणुकीला उभा राहणार असून शंभर टक्के ही निवडणूक जिंकणार आहे. इलेक्ट्रॉनिक मीडियावर आज माझ्या संदर्भात ज्या काही बातम्या येत आहेत. त्या संदर्भात आज काही प्रतिक्रिया देणार नाही, असेही ते म्हणाले.यावेळी गोकुळचे माजी अध्यक्ष रणजीत सिंह पाटील, बाबासाहेब पाटील वाळवेकर ,पांडुरंग कुडवे, संकेत भोसले यांची भाषणे झाली. कार्यक्रमास नामदेवराव मेंडके अनंत फर्नांडिस ,एम.पी .पाटील दत्तामामा खराडे, जीवन साळोखे ,अशोक खंडागळे, विजय राजिगरे, प्रवीण चौगुले, महेश पाटील, रतन जगताप आदी उपस्थित होते.

रस्त्यांवर खड्डे; नऊ ठेकेदारांना नोटीस

सातारा : सततच्या पावसामुळे शहरातील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली असून याप्रकरणी पालिकेने संबंधित ९ ठेकेदारांना नोटीसा बजावल्या आहेत. यात केलेले काम मुदतीत असल्याने रस्त्याचे काम पुर्ववत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सातारा शहरासस परिसरात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाउस सुरु आहे. पावसाळ्यापुर्वी पालिकेने शहरातील विविध भागातील रस्त्यांची कामे पुर्ण करुन घेतली होती.

पहिल्याच पावसात या रस्त्यांची दुरावस्था झाली. अनेक ठिकाणचे डांबरी थर वाहून गेल्याने तसेच इतर अनेक कारणांमुळे रस्ते खराब झाल्याच्या नागरीकांच्या तक्रारी सातत्याने पालिकेकडे येवू लागल्या. याची दखल घेत पालिकेने रस्त्याच्या कामांची पाहणी केली. पाहणीत कामांत दोष आढळल्याने त्याबाबतचा अहवाल पालिकेच्या बांधकाम विभागाने तयार केला. यानुसार मुख्याधिकारी अभिजित बापट यांनी रस्त्याचे काम करणाऱ्या ९ ठेकेदारांना नोटीसा बजावल्या आहेत. केलेले काम देखभाल, दुरुस्ती या कालावधीतील असल्याने दुरावस्था झालेले रस्ते पाउस थांबल्यानंतर पुर्ववत करुन देण्याचे आदेश या नोटीसीत आहेत.

/ गुन्हे वृत्त... /

जखमी पुरुषाचा मृत्यू

सातारा : जखमी अवस्थेत आढळलेल्या पुरुषाचा मृत्यू झाल्याची नोंद सातारा शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, वर्ये ता.सातारा गावच्या हद्दीत अनोळखी अंदाजे ५० वय असलेला पुरुष पाण्यात जखमी अवस्थेत आढळला. याची माहिती हॉटेलमधील कामगारांनी १०८ रुग्णवाहिकेला दिल्यानंतर जखमीला सिव्हीलमध्ये आणण्यात आले. मात्र उपचारावेळी त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद सातारा शहर पोलिस ठाण्यात झाली आहे.

जुगार प्रकरणी एकावर कारवाई

सातारा : जुगार प्रकरणी सातारा तालुका पोलिसांनी एकावर कारवाई केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, लिंब ता.सातारा येथे जुगार प्रकरणी जयदीप पोपटराव यादव (वय ४२, रा.वाढे ता.सातारा) याच्या विरुध्द सातारा तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी त्याच्याकडून २०४० रुपये व जुगाराचे साहित्य जप्त केले आहे.

अस्तित्व लपवल्याप्रकरणी दोघांवर कारवाई

सातारा : सातारा शहर परिसरात दोन ठिकाणी संशयास्पद हालचाली करत असताना दोघेजण आढळल्यानंतर पोलिसांनी त्यांच्याविरुध्द गुन्हे दाखल केले आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, पहिल्या कारवाईत सुभाष शामराव महाडीक (वय ५०, रा. लावंघर, करंजे ता.सातारा) हा सातारा एसटी स्टॅन्ड येथे पार्कींगच्या आडोशास पोलिसांना रात्री ११.३० वाजता दिसून आला.

दुसर्या कारवाईत दत्तात्रय मारुती साबळे (वय ४५, रा.वडूथ ता.सातारा) हा बाल सुधारगृह परिसरात रात्री १२ वाजण्याच्या सुमारास आढळून आला. यामुळे पोलिसांनी दोघांवर अस्तित्व लपवल्याप्रकरणी गुन्हे दाखल केले.

विसावा नाका येथे चोरट्यांचा धुडगूस

सातारा : विसावा नाका परिसरात चोरट्यांनी काल मध्यरात्री धुडगूस घातल्याची नोंद सातारा शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सातारा शहरातील गजबजलेल्या विसावा नाका येथे चोरट्यांनी मध्यरात्री धुडगूस घातला. सुमारे हॉटेल, बेकरी, पानपट्टी अशा पाच दुकानांना टार्गेट करत चोर्या केल्या. सुदैवाने व्यवसायिकांचे यामध्ये मोठे नुकसान झाले नाही. ओम प्रवीण ताटे (वय २२, रा. शनिवार पेठ, सातारा) यांनी सातारा शहर पोलिस ठाण्यात अज्ञातांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

कोडोली येथील राडा प्रकरणी परस्पर विरोधी गुन्हे

सातारा : सातार्यातील कोडोली येथे दोन गटात राडा झाला असून शहर पोलिस ठाण्यात परस्पर विरोधी गुन्हे दाखल झाले आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, विनित संजय कदम (वय २१, रा. झेंडा चौक, कोडोली) या युवकाने प्रशांत सावंत, साहील सावंत व गौरव जाधव या तिघांविरुध्द तक्रार दिली आहे. दुसरी तक्रार श्रीरंग उत्तम सावंत (वय ४७, रा. झेंडा चौक, कोडोली) यांनी विजय कदम, विनित कदम, ऋषीकेश चव्हाण या तिघांविरुध्द तक्रार दिली आहे.

ही घटना दि. २ ऑगस्ट रोजी रात्री झेंडा चौक येथे घडली आहे. जुन्या भांडणाच्या कारणातून दोन गटाने एकमेकांना फायटर, धारदार हत्यार यांनी मारहाण करत जखमी केले. या घटनेनंतर परिसरा तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. जखमींना रग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. दोन्ही गटाकडून तक्रार दिल्याने पोलिसांनी परस्पर विरोधी तक्रारी दाखल करुन घेतल्या.

गोडोली येथील राडा प्रकरणी परस्पर विरोधी गुन्हे

सातारा : गोडोली येथे रविवारी सांयकाळी दोन युवकांच्या गटात राडा होवून थेट कार पेटवून दहशत माजवल्याची धक्कादायक घटना समोर आली. खाक झालेली कार पोलिस बॉयची असून शहर पोलिस ठाण्यात परस्पर विरोधी गुन्हे दाखल झाले आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, एक गट लघुशंकेसाठी थांबला होता तर दुसरा युवकांचा गट तेथे रील्स बनवत होता. यातून वाद होत हाणामारीत डोक्यात दारुची बाटली फोडण्यात आली असून धारदार शस्त्राचा वापर झाल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. दरम्यान, पोलिसांनी तिघांना अटक केली आहे.

गौरव सुधाकर शिंदे (वय २७, रा. गोळीबार मैदान, सातारा) या युवकाने वेदांत साठे, प्रितम चव्हाण, मन्या पवार, संतोष लंकेश्वर, अथर्व माने (सर्व रा.प्रतापसिंहनगर, सदरबझार, सातारा) यांच्या विरुध्द तक्रार दिली आहे.

अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या महाराष्ट्र प्रदेश संघटकपदी संजू पाटील यांची निवड

उंडाळे : घोगाव ता.कराड येथील संजू तुकाराम पाटील यांची अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या महाराष्ट्र प्रदेश संघटकपदी निवड करण्यात आली. ते सध्या दैनिक कृष्णा एक्सप्रेस नवी मुंबई प्रतिनिधी असुन त्यांच्याकडे नवी मुंबई कार्यक्षेत्र दिले असून संजू पाटील यांच्यावर एक मोठी जबाबदारी पत्रकार संघाने दिली आहे .अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष कैलास देशमुख यांनी संजू पाटील यांची निवड केली संजू पाटील यांना वीस वर्षांचा पत्रकारितेचा अनुभव असून नवी मुंबई येथील विविध विभागवार विषय म्हणजे स्वच्छता, रुग्णालय, पाणीपुरवठा, उद्याने, रस्ते तसेच शैक्षणिक या बाबत मोठ्या प्रमाणात नागरिकांना होणाऱ्या समस्या ,सुविधा याविषयी परखड वृत्तांकन संजू पाटील यांनी केले तसेच या सर्व समस्यांचा पाठपुरावा करून या सोडवण्यासाठी आपल्या लेखणीतून व न्यूज चॅनलच्या माध्यमातून काम केलं. ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई साहेब यांना निवेदने देऊन हे अने प्रश्न मार्गी लावण्याचे काम संजय पाटील हे सतत करत असतात .त्याचबरोबर सातारा जिल्ह्यामधील कराड येथील हजारो विद्यार्थ्यांसाठी परिवहन विभागाच्या बसेस त्वरित सुरू कराव्यात यासाठी ही संजय पाटील यांनी मंत्रालयात पाठपुरावा केला व त्याची त्वरित दखल परिवहन विभागाने घेतली आहे. सर्व मान्यवरांकडून संजय पाटील यांची निवड झालेबद्दल अभिनंदन केले आहे.

रा.ना. गोडबोले ट्रस्टतर्फे विद्यार्थ्यांना ७४ हजारांची शैक्षणिक मदत

सातारा : सातारा येथील गोडबोले कुटुंबीयांतर्फे रा. ना. गोडबोले सार्वजनिक ट्रस्ट मार्फत गरीब , होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना ७४ हजारांची शैक्षणिक मदत १२० विद्याथ्र्यांना करण्यात आली . गेले सहा दशके हा मदत यज्ञ अखंडपणे सुरू असल्याचे ट्रस्टच्या वतीने सांगण्यात आले .

बालवाडी ते महाविद्यालय व शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांचा यात समावेश असतो. यावर्षीचा हा कार्यक्रम समर्थ सदन , सातारा येथे संपन्न झाला. यावेळी बालवाडी ते पाचवी पर्यंतच्या विद्यार्थी - विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते शैक्षणिक मदत प्रदान करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून श्रीमती शोभा निंबाळकर , सौ सुनीता गोरे , सौ प्रतिभा कुलकर्णी , सौ वैशाली काळे या उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते विद्यार्थी - विद्यार्थिनींना शैक्षणिक मदतीचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना सर्वच प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतात रा. ना. गोडबोले सार्वजनिक ट्रस्टच्या सातत्याने होणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक केले. अशीच सामाजिक जाणीव प्रत्येकाने जपली पाहिजे असे सांगत सर्व समाजातील गरीब , होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना त्यांनी भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविक व ट्रस्ट ची माहिती देताना डॉ चैतन्य गोडबोले यांनी यावर्षी साडे चारशे विद्यार्थी - विद्यार्थिनी व २१ संस्थांना साडे पाच लाख रुपयांची मदत देण्यात येत असल्याचे सांगितले.

बालवाडी ते चौथीच्या १२० विद्यार्थ्यांना ७४ हजार रुपयाची शैक्षणिक मदत करण्यात आली.

सौ संजीवनी व सौ अस्मिता गोडबोले यांनी पुस्तक व फुले देऊन पाहुण्यांचे स्वागत केले. पाहुण्यांचा परिचय प्रद्युम्न गोडबोले यांनी करून दिला. डॉ. चैतन्य गोडबोले यांनी आभार मानताना आयडीबीआय ट्रस्टच्या मानसी माचवे व ट्रस्टींचे आभार मानले.

यावेळी डॉ अच्युत गोडबोले ,अशोक गोडबोले , प्रा. अविनाश लेवे , विजय मांडके, उल्हास भिडे, गौतम भोसले आदी उपस्थित होते.

तारळी प्रकल्पग्रस्तांचे जिल्हाधिकारी कार्यालयावर बेमुदत उपोषण

भर पावसामध्ये खातेदार उपोषणाला रस्त्यावर

सातारा : गेल्या २३ वर्षापासून न्यायाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या तारळी प्रकल्पग्रस्तांचे बेमुदत उपोषण सोमवारपासून जिल्हाधिकारी कार्यालयावर सुरू झाले .श्रमिक मुक्तिदल समतावादी संघटनेचे डॉक्टर प्रशांत पन्हाळकर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे या आंदोलनामध्ये शंभरहून अधिक खातेदार सहभागी झाले आहेत

संकलन रजिस्टर अद्ययावत न होणे, गावठाणाच्या सुविधा न मिळणे, बोगस लाभार्थ्यांकडून जमिनीचे परस्पर ग्रहण केले जाणे अशा विविध तक्रारी तारळी प्रकल्पग्रस्तांच्या आहेत .या संदर्भात डॉक्टर प्रशांत पन्हाळकर यांनी पत्रकार परिषद घेऊन दोन दिवसापूर्वी आंदोलनाचा इशारा दिला होता . जिल्हा प्रशासनाकडे या संदर्भात बैठक लावण्याची मागणी केली होती. जिल्हा पुनर्वसन विभागाने या बैठकीत कानाडोळा केला .या घटनांच्या निषेधार्थ डॉक्टर प्रशांत पन्हाळकर यांनी खातेदारांसह बेमुदत उपोषण सुरू केले आहे सकाळी साडे अकराच्या दरम्यान खातेदार ग्रामस्थ यांनी पन्हाळकर यांच्या उपस्थितीत शाहू चौकातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन केले तेथून सर्व ग्रामस्थ मोर्चाने चालत जिल्हाधिकारी कार्यालयावर आले

या मागण्या संदर्भात जोपर्यंत प्रशासन न्याय भूमिका घेत नाही तोपर्यंत हे आंदोलन असेच सुरू राहणार असल्याचे पन्हाळकर यांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे .तारळी प्रकल्पग्रस्तांच्या कराड पाटण माण खटाव या तालुक्यातील जमिनी याच प्रकल्पाला मिळाव्यात अन्य कोणत्याही प्रकल्पाला या जमिनी हस्तांतर होऊ नयेत अशी या खातेदारांची मूळ मागणी आहे . मात्र शासन या संवेदनशील मागणीकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप डॉक्टर प्रशांत पन्हाळकर यांनी केला आहे

साताऱ्यात पहिल्या श्रावण सोमवार निमित्त भाविकांची महादेव मंदिरात धाव

सातारा : छत्रपतींची राजधानी असलेल्या सातारा नगरीमध्ये तसेच सातारा जिल्ह्यामध्ये धार्मिक महोत्सव मोठ्या आनंदाने साजरा करत असतात. अठरा वर्षानंतर या श्रावण महिन्यामध्ये पाच सोमवार आले आहेत . या पहिल्या श्रावणी सोमवारी सातारा तालुक्यातील निसर्गरम्य अशा यवतेश्वर मंदिरात अनेक भाविकांनी दर्शनासाठी धाव घेतली आहे. श्रीच्या दर्शनाने चेहऱ्यावर समाधान व आनंद घेऊन जाणाऱ्या भाविकांमुळे खऱ्या अर्थाने श्रावण सरी मनामध्ये सुद्धा कोसळल्या असल्याचे दिसून आले आहे.

सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील शिखर शिंगणापूर ,महाबळेश्वर तालुक्यातील श्री क्षेत्र महाबळेश्वर, सातारा तालुक्यातील संगम माहुली येथील काशी विश्वेश्वर मंदिर, देगाव येथील पाटेश्वर मंदिर सातारा शहरातील शुक्रवार पेठेतील मंदिर, कोटेश्वर मंदिर लिंब - गोवे येथील कोटेश्वर मंदिर, परळी येथील पांडवकालीन शिवमंदिर तीर्थक्षेत्र नागनाथ वाडी फलटण येथील जबलेश्वर मंदिर ,कराड तालुक्यातील वैजापूर येथील पावकेश्वर मंदिर गोंदवले येथील कराड तालुक्यातील कोयनेश्वर मंदिर सदाशिव गड मधील शंभू महादेव मंदिर भाडळी खुर्द येथील ओम संगमेश्वर महादेव मंदिर शिरवळ येथील केदारेश्वर मंदिर माण तालुक्यातील लिंगेश्वर मंदिर वाई येथील भद्रेश्वर मंदिर, खटाव तालुक्यातील श्री सिद्धेश्वर कुरोली ,वडूज येथील श्री तारकेश्वर,श्री महादेव मंदिर, गोंदवले येथील भीमाशंकर मंदिर, कोरेगाव तालुक्यातील हरीश्वर मंदिर ,जावळी तालुक्यातील नरफदेव मेरुलिंग मंदिर, मरण मोरे येथील मरडेश्वर मंदिर केळकर येथील काळेश्वर मंदिर येथील तसेच कोयनेश्वर मंदिर, शंभू महादेव मंदिर, संगमेश्वर महादेव मंदिर, रायगाव व सायगाव येथील महादेव मंदिर अशा अनेक ठिकाणी भाविकांनी शिवमंदिरात जाऊन मंदिरातील गाभाऱ्यातील पिंडीचे दर्शन घेऊन श्रावणी सोमवार साजरा केला.

यावेळी अनेकांचे उपवास असल्यामुळे खिचडी, शाबू वडा, केळी ,वेफर्स उपासाचे साहित्य अशा सुमारे आठ ते दहा लाख रुपयांची विक्री झाल्याची माहिती विविध भागातील फळ विक्रेते व हॉटेल व्यवसायिकांनी दिली. विशेषतः तरुण व महिलांची गर्दी मोठ्या संख्येने दिसून येत होती. श्रावण महिन्यातील अनेक सण हे माता-भगिनींशी निगडित असल्यामुळे खऱ्या अर्थाने सावन को आने दो... सावन का महीना पवन करी शोर ... कुछ कहता है ये सावन... श्रावणात घन निळा बरसला...अशा मधुर गाण्याने सुद्धा रसिकांना व भाविकांना मनमुराद आनंद दिला. या गाण्यांनी जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आहे.

बऱ्याच मंदिराच्या आवारात व परिसरात दूचाकी व चार चाकी वाहनांची गर्दी होऊ लागल्यामुळे अनेक वयोवृद्ध भाविकांना अडथळा सुद्धा सहन करावा लागला. पुढील श्रावण सोमवारी स्थानिक ग्रामस्थ यांनी वाहतूक व्यवस्था बघावी. अशी मागणी वयोवृद्धांनी केलेली आहे.

विद्युत खांबावरील या हिरव्यागार वेली ठरणार का अपघाताला निमंत्रण ?...

सातारा शहरात सध्या संततधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले आहे .त्यातच वारंवार होणाऱ्या वीज पुरवठा खंडित प्रकारामुळे सातारकर अक्षरशः त्रस्त झाले आहेत .शहरातील अनेक उंच उंच अशा या विजेच्या खांबावर वाढलेल्या हिरव्यागार वेली अपघाताला निमंत्रण ठरणार नाहीत ना ?असाच प्रश्न सामान्य सातारकरांना पडत आहे. देवी चौक परिसरातील हे दृश्य आपल्या कॅमेरा टिपले आहे अतुल देशपांडे सातारा यांनी.